# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

**दिनांक १०.०३.२००६ रोजी संपन्न झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक १० मार्च २००६ रोजी मा.महापौर श्री.किशनचंद लेखराज तनवाणी यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील ''प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह'' येथे सकाळी १०.५५ वाजता ''वंदेमातरम्''या गिताने सुरू झाली. सभेला प्र. आयुक्त यांचे सह संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स. सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.भगवान घडमोडे
०२. स.स.श्री.काशिनाथ कोकाटे
०३. स.स.श्री.संजय शिरसाट
०४. स.स.श्री.तरविंदरसिंग धिल्लन
०५. स.स.श्री.बम्हणे पुनमचंद सोनाजी
०६. स.स.श्री.सुरे सिताराम इसराम
०७. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०८. स.स.श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०९. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
१०. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
११. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१२. स.स.श्री.ठाकुर पुरूषोत्तम रघुविरसिंग
१३. स.स.श्री.खान सलीम खान यासीन
१४. स.स.श्री.पाटील अलका रमेश
१५. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१६. स.स.सौ.मसरद बेगम शरफोद्दीन
१७. स.स.श्री.गायकवाड दिलीप नारायण
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
२०. स.स.श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
२१. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
२२. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
२३. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२४. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२५. स.स.सौ.रगडे सुशिला भगवान
२६. स.स.श्रीमती शिंदे मिराबाई रामराव
२७. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२८. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२९. स.स.सौ.खान मेहेरून्नीसा खान हमीद
३०. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
३१. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
३२. स.स.श्री.खान जावेद हसन कासीम हसन

३३. स.स.श्री.अ.रशिद खान मामु
३४. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३५. स.स.श्री.पाटील नरवडे वसंत पांडुरंग
३६. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३७. स.स.सौ.सिध्द वीणा गजेंद्र
३८. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३९. स.स.सौ.कुरैशी नजमा बेगम युनूस
४०. स.स.श्री.खान मुजीब मीर आलम खान
४१. स.स.श्री.हाजी शेरखान अ.रहेमान
४२. स.स.सौ.खान आबेदा बेगम गुलाब खान
४३. स.स.सौ.राऊत छाया विलास
४४. स.स.श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
४५. स.स.श्री.बैनाडे कंवरसिंग किसनसिंग
४६. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४७. स.स.श्री.गायकवाड कैलास लक्ष्मण
४८. स.स.सौ.शेख शमशाद बेगम शेख हफीज
४९. स.स.श्री.जेजुरकर संतोष सुधाकरराव
५०. स.स.श्री.पटेल सलिम समशेर पटेल
५१. स.स.श्री.मोतीवाला अशरफ म.युनुस
५२. स.स.श्री.तुपे त्र्यबंक गणपतराव
५३. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
५४. स.स.श्री.कटकटे सतीष विश्वनाथ
५५. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
५६. स.स.श्री.कराड भागवत किसनराव
५७. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५८. स.स.श्री.वैद्य रेणुकादास दत्तोपंत
५९. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
६०. स.स.श्री.गांगे रविंद्र लक्ष्मण
६१. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
६२. स.स.श्रीमती डॉ.बिनवडे आशा उत्तम
६३. स.स.श्री.खुडे विजय किसन
६४. स.स.श्री.खेंडके संतोष सर्जेराव
६५. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
६६. स.स.श्री.शिंदे दामोधर माधवराव
६७. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६८. स.स.सौ.ससाणे सरीता अशोक
६९. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
७०. स.स.श्री.कावडे साहेबराव राणुबा
७१. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
७२. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
७३. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
७४. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय

७५. स.स.सौ.संगिता विठ्ठलराव जाधव
७६. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
७७. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७८. स.स.सौ.खंदारे वंदना प्रकाश
७९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
८०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
८१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
८२. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
८३. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
८४. स.स.श्री.मोरे कचरू विश्वनाथ
८५. स.स.सौ.जैन अल्पा विकास
८६. स.स.श्री.बारवाल गजानन
८७. स.स.सौ.मोमीन सफीया फिरदोस
८८. स.स.श्री.अ.साजेद अ.सत्तार
८९. स.स.सौ.घोडेले अनिता नंदकुमार

**नामनिर्देशित पालिका सदस्य**

०१. स.स.श्री.राजेश व्यास
०२. स.स.श्री.सुरेंद्रसिंग सबरवाल

**चर्चा :**

श्री. अ. रशीद खान : वाराणसी येथे मंदीरात जी दुर्घटना घडली त्या घटनेत निष्पाप लोकांचा मृत्यू झालेला आहे. त्यामूळे या घटनेचा निषेध करावा. व मृत्यू पावलेल्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री. गजानन बारवाल : यास माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :वाराणसी येथे जी घटना घडली त्यांचा या सभागृहातर्फे निषेध करण्यात येतो तसेच या घटनेत ज्यांचा मृत्यू झाला त्यांना दोन मिनिटे श्रध्दाजली अर्पण करण्यासाठी सर्वानी उभे रहावे.

(याच वेळी वाराणसी येथे मदीरांत जी दुर्घटना घडली त्यात जे लोक मृत्यूमूखी पडले त्यांना सभागृहातर्फे दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर : निवडणूक प्रक्रीया चालू करण्यात यावी.

**विषय क्र. २१५/१ :**

मुंबई प्रातिंक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ अन्वये स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एका पदावर सभासदाची निवड करणे.

नगरसचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३ अन्वये स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदाची निवडी करण्याकरीता दिनांक २८/०२/२००६ रोजी औरंगाबाद महानगरपालिका सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५,५९,६० व ६२ अन्वये निवडणूक कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ०३ मार्च २००६ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पुर्ण झाली असुन दिनांक ०३ मार्च २००६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यत स्थायी समितीच्या

रिक्त झालेल्या एक सदस्य पदासाठी खालील प्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड |
| ०२ | श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा |
| ०३ | श्री.जेजुरकर संतोष सुधाकर |
| ०४ | श्रीमती पोळ सरला सखाराम |

सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ५९ अन्वये प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात आली असुन खालील नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेली आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड |
| ०२ | श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा |
| ०३ | श्री.जेजुरकर संतोष सुधाकर |
| ०४ | श्रीमती पोळ सरला सखाराम |

पिठासीन अधिकारी : वरील पैकी ज्या उमेदवारांना नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असेल त्यांना सुचक व अनुमोदक यांच्या संमतीने आपला उमेदवारी अर्ज परत घेता येईल.

सभेत सुचक किंवा अनुमोदक या पैकी एखादा उपस्थित नसेल तर इच्छुकाला या दोहोपैकी जो कोणी सभेला उपस्थित आहे त्याच्या संमतीने ३० मिनिटाच्या अवधित म्हणजेच ११.३० वाजेपर्यंत आपले नांव परत घेता येईल. तरी कृपया ज्यांना स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदासाठी आपली उमेदवारी परत घ्यावयाची असेल त्यांना आताच सांगितल्याप्रमाणे आपले नांव ११.३० वाजेपर्यंत परत घेता येईल. मात्र वेळेनंतर स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदासाठी नामनिर्देशन पत्र परत घेता येणार नाही. कृपया याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पिठासीन अधिकारी : स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदासाठी ०४ उमेदवार पैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | श्रीमती मंगला प्रकाश गायकवाड |
| ०२ | श्रीमती पोळ सरला सखाराम |

आता स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदाच्या निवडणूकीसाठी खालील प्रमाणे उमेदवार रिंगणात आहेत.

| | |
|---|---|
| ०१ | श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा |
| ०२ | श्री.जेजुरकर संतोष सुधाकर |

पिठासीन अधिकारी : मतदानाबाबत गोपनीयता पाळता यावी म्हणून मतपत्रिकेच्या स्थळप्रतिवर अनुक्रमांक राहील. मात्र मतपत्रिकेवर अनुक्रमांक राहणार नाही. मतपत्रिकांची सर मिसळ करण्यात येईल. तसेच स्थळ प्रतिवर अनुक्रमांक असल्याने कोणत्या क्रमांकाची मतपत्रिका कोणास दिली याचा बोध होणार नाही त्यामुळे मतदानाची गुप्तता पाळली जाईल.

मतपत्रिका ४५ मिनिटात तयार होतील मतदानाला सुमारे १२.३० वाजता सुरूवात होईल. तरी मतपत्रिका तयार करण्यासाठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांनी मतपत्रिका तयार करून घ्यावी व त्यानंतर नगरसचिव यांनी सर्व स.सदस्यांच्या माहितीसाठी नमुना मत पत्रिका सभागृहात फलकावर लावण्याची व्यवस्था करावी.

पिठासीन अधिकारी : मतपेटीजवळ नियुक्त केलेले मतदान अधिकारी यांनी मतपेटी रिकामी असल्याचे सभागृहास दाखवुन द्यावे व मतपेटीला कुलूप लावून तीची चावी माझेकडे आणून

द्यावी व मतपेटी मोहोरबंद करून घ्यावी (पिठासीन अधिकारी स्वत:च्या सहिने मतपेटी मोहोरबंद करून घेतील)

सभाकामकाज नियमावलीचे नियम क्र.५१ अन्वये मतमोजणीच्या वेळी उमेदवाराला स्वत: उपस्थित राहण्याची इच्छा नसेल तर त्यांनी मतमोजणी पाहण्याकरीता एखाद्या सभासदाला आपला प्रतिनिधी म्हणून पाठविता येईल. त्यासाठी मतदान सुरू होण्यापुर्वी म्हणजेच आता त्यांनी त्यांची नांवे माझेकडे लेखी स्वरूपात देणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या वेळी उमेदवार किंवा त्यांनी नेमलेल्या प्रतिनिधी यांनाच मतमोजणी पाहता येईल.

नगरसचिव यांनी कृपया मतदानासंबंधीच्या सूचना सभागृहाच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

नगरसचिव : १. मतदानास प्रत्यक्ष सुरूवात करतांना प्रभागनिहाय स.सदस्यांची नांवे पुकारण्यात येतील.

२. महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात आलेल्या पेननेच आपले मत नोंदवावे.

३. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्रमांक ४५ (आय) प्रमाणे सभासदाला दिलेली मतपत्रिका खराब झाली तर त्यांना मा.पिठासीन अधिकारी यांच्या अनुमतीने दुसरी मतपत्रिका देता येईल.

४. ✻ सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.६२

जितक्या जागा भरावयाच्या असतील तितकी मते देण्यांचा प्रत्येक सभासदाला अधिकार आहे. आता स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदासाठी निवडणूक होत असल्यामुळे प्रत्येक सदस्यांना एक मते देण्याचा अधिकार आहे. मतदान करतेवेळी प्रत्येक सभासद मतपत्रिकेच्या उजव्या बाजुला ज्या इच्छुकाला मत द्यावयाचे असेल त्याच्या नावासमोर ( X ) फुली करावी.

तसेच सदरची मते एकाच उमेदवारास किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारास आपल्या इच्छेनुसार विभागून देता येतील. मात्र आठ पेक्षा जास्त मते देवू नये.

५. सभा कामकाज नियमावलीच्या नियम क्र. ४५ (जे) मधील तरतुदीनुसार खालील परिस्थितीत मतपत्रिका अवैध समजली जाईल.

१. जर मतपत्रिकेवर सभासदाने आपले नांव किंवा शब्द लिहिला असेल अथवा तो ओळखता येईल अशा रितीने तिच्यावर काही खुण केलेली असेल अथवा .....

२. जी छिद्रांकित (परफोरेटेड) नसेल अथवा......

३. जीच्यावर मत नोंदविले नसेल अथवा जी संदिग्धतेमुळे निरउपयोगी आहे.

पिठासीन अधिकारी : नमुना मतपत्रिका फलकावर चिकटविण्यात आलेली आहे.

आता मतदानाला सुरूवात होत आहे. प्रभागनिहाय स.सभासदांची नांवे पुकारण्यात येतील. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (एफ) च्या अनुषंगाने मतदानासाठी १ तासाचा कालावधी देण्यात येत असुन सभागृहातील घड्याळाप्रमाणे आता १२.५० वाजले असुन मतदान १.५० वाजता संपेल. सभा कामकाज नियमावलीचे नियम क्र.४५ (जी) प्रमाणे मतदानाची वेळ संपल्यानंतर स्थायी समितीच्या रिक्त एक सदस्य पदासाठी मतदान करता येणार नाही. कृपया याची सर्व स.सदस्यांनी नोंद घ्यावी व मतदान शांततेत व सुरळीतपणे पार

पाडण्यांस सहकार्य करावे अशी सर्वांना विनंती. मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियम क्रमांक ४५ च्या तरतुदी प्रमाणे कार्यालयीन आदेश क्रमांक मनपा/नस/ २००६/१४६ दिनांक ०८/०३/२००६ अन्वये अधिकारी व कर्मचारी यांची केलेली नियुक्ती कायम करण्यात येत असुन सदर आदेशाद्वारे ज्यांना ज्यांना जी कामे नेमून देण्यात आलेली आहेत त्यांनी ती कामे जबाबदारीने पार पाडावीत.

पिठासीन अधिकारी : जनसंपर्क अधिकारी यांनी आता मतदारासाठी प्रभाग निहाय नावे पुकारावीत.

जनसंपर्क अधिकारी : प्रभाग निहाय नाव पुकारल्यानुसार अनुक्रमे वार्ड क्र.४,५,६,७ ८,९, चे स.सदस्यांनी मतदान केले. यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी आदेशीत केल्यानूसार वार्ड क्र ८८,९४,चे स.सदस्यांनी मतदान केले यानंतर वार्ड क्र १, १०, ३, २, ११, १२,१३,१५,१६,१७,१८,१९,चे स.सदस्यांनी मतदानात भाग घेतला तर मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशीत केल्यानूसार वार्ड क्र ९८चे स. सदस्यांनी मतदान केले. यानंतर वार्ड क. २० चे स. सदस्यांनी मतदान केले वार्ड क्र २२चे स. सदस्य यांनी मतदान करण्यासाठी मदतनीसची लेखी मागणी केल्यानूसार मा. पिठासीन अधिकारी यांनी मुख्यलेखा परीक्षक श्री. औताडे यांचे नाव सूचित केल्यानूसार मतदानासाठी त्यांनी मदत केली. यानंतर वार्ड क्र २३, २४, २५, २६, २८, २९, ३०,३२,चे स.सदस्यांनी मतदान केले वार्ड क्र ३३ चे स. सदस्य तथा पिठासीन अधिकारी यांनी मतदान केले त्यावेळी तात्पूरते पिठासीन अधिकारी म्हणून मा. उपमहापौर यांनी आसनगृहन केले.यानंतर वार्ड क्र ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ४२, ४५, चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला तसेच वार्ड क. ४६ चे स. सदस्यांचे नाव पूकारले असता त्यांनी मदतनीसची मागणी केल्यानूसार मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशीत केल्यानूसार विधी सल्लागार श्री. सिरसाट यांनी मतदान करण्यासाठी मदत केली. यानंतर वार्ड क्र ४७, चे स.सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र १४,चे स.सदस्य यांनी पहिली मतपत्रिका खराब झाल्याने त्यांना दुसरी मतपत्रिका मा. पिठासीन अधिकारी यांचे सूचनेनूसार देवून त्यांनी मतदान केले तर यानंतर वार्ड क्र २१, ४८, ४९, ५०, ५१, ५३,चे स. सदस्यांनी मतदान केले यानंतर मा. पिठासीन अधिकारी यांनी सूचना केल्यानूसार वार्ड क्र ६४ , ५५ ,७८, ९१,८५चे स. सदस्यांनी मतदान केले यानंतर वार्ड क. ५४,५६,५७, चे स. सदस्यांनी मतदान केले तर वार्ड क्र ५८ चे स. सदस्य यांनी मतदानासाठी मदतनीसची मागणी केल्यानूसार मा. पिठासीन अधिकारी यांनी आदेशीत केल्यानूसार वैद्यकीय अधिकारी सौ. पाटील यांनी मतदानास मदत केली तर यानंतर वार्ड क्र ५९, ७१, ६१, ८२, ६२, ६३, ६५, ६७, ६८, ६९,७७, ७०, ९७, ७२, ७३, ७४, ७५, चे स. सदस्यांनी मतदानात भाग घेतला यानंतर प्र पिठासीन अधिकारी असलेले वार्ड क. ७६ चे स.उपमहापौर यांनी मतदान केले त्यावेळी मा.महापौर पिठासीन अधिकारी आसनग्रहन करतात. यानंतर वार्ड क्र ८०, ८१, ८३, ७९, ८४, ८६, ८७, ८९, ९०, ९२, ९३, ९५, ९६ चे स. सदस्यांनी मतदान केले.

पिठासीन अधिकारी : आता १.५० वाजले असुन मतदान संपले आहे असे मी घोषीत करतो. मतदान अधिकारी यांनी आता मतपत्रिका देवू नयेत. मतपेटी जवळील मतदान अधिकारी यांनी मतपेटीची मतपत्रिका टाकावयाची फट बंद करावी व मतपेटी माझ्याकडे आणावी.

उमेदवारांस किंवा त्यांनी प्रधिकृत केलेल्या प्रतिनिधीलाच मतमोजणी पाहण्याची परवानगी आहे. इतर स.सदस्यांनी मतमोजणीच्या वेळी मतमोजणीच्या ठिकाणी

कृपया गर्दी करू नये व सभागृहात शांतता ठेवून निवडणूक प्रक्रिया पुर्ण करण्यास सहकार्य करावे ही विनंती.

पिठासीन अधिकारी :

मतमोजणीचे काम पुर्ण झाले आहे

एकुण मतदान - ८९

अवैध मते - ०२

वैध मते - ८७

उमेदवारांना पडलेली मते खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | उमेदवारांची नांवे | पडलेली मते |
|---|---|---|
| १. | श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर | ५७ |
| २. | श्री.दाभाडे हिम्मतराव साळूबा | ३० |

मतमोजणीच्या निकालावरून मी असे घोषीत करतो की, स्थायी समितीच्या रिक्त झालेल्या एक सदस्य पदासाठी श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर यांची निवड झाली असुन मी त्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर नुतन स.सदस्य श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर यांचे मा.पिठासीन अधिकारी पुष्पगुच्छ देवून स्वागत करतात.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार स्थायी समिती सदस्य पदासाठी श्री.संतोष सुधाकरराव जेजुरकर यांची बहुमताने निवड झाली, त्यास मंजूरी देण्यांत आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद